# आषाढी एकादशीनिमित्त आज मंगळ बाजारात फराळ वाटप

■ नंदुरबार । प्रतिनिधी

पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी आतुर असलेल्या वारकरी बांधवांसह सर्वांना आषाढी एकादशीची प्रतीक्षा असते. यंदा आषाढी एकादशीचे औचित्य साधून विठ्ठल रखुमाई यांच्या आरती सह भाविकांना एकशे एक किलो साबुदाणा खिचडी फराळाचे वाटप करण्यात येणार आहे. मंगळ बाजार व्यापारी असे संस्थापक अध्यक्ष महेंद्र मंगा चौधरी यांनी केलेल्या संकल्पानुसार आज बुधवार दि. १७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता मंगळ बाजार परिसरात टाळ मृदंग आणि भक्ती गीतांच्या तालासुरात पंढरीच्या विठुरायाचे नामस्मरण होणार आहे. याचबरोबर मान्यवरांच्या हस्ते वारकरी आणि भाविकांना उपवासानिमित्त फराळाचे वाटप करण्यात येणार आहे. भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन मंगळ बाजार व्यापारी असोसिएशन तर्फे महेंद्र मंगा चौधरी यांनी केले आहे.

# चादर जाळणे तसेच ९ सायकली जाळल्याप्रकरणी एक ताब्यात

■ नंदुरबार । प्रतिनिधी

नंदुरबार शहरात एका धार्मिक स्थळावरील चादर जाळणे तसेच ९ सायकली जाळल्याप्रकरणी एकास ताब्यात घेण्यात आले असून त्याने दोन्ही गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

नंदुरबार शहरातील शादुल्ला नगर परिसरात असलेल्या टेकडीवरील एका धार्मिक ठिकाणची चादर कोणीतरी अज्ञात इसमाने जाळुन नुकसान करुन एका धर्माचा अपमान केल्याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची घटना नागरिकांच्या धार्मिक भावनेशी संबंधीत असल्यामुळे तसेच जातीय दृष्ट्या संवेदनशील असल्यामुळे घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., उपअधीक्षक संजय महाजन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार खेडकर व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर घटनास्थळावर काही संशयास्पद वस्तु मिळून आल्यानंतर त्या तपासकामी जप्त करण्यात आल्या होत्या. त्यातच दि.१६ जुलै रोजी रात्री १२.३० वाजेच्या सुमारास नंदुरबार शहरातील शाहदावल मशीदच्या बाजुला शेख नासिर शेख हनीफ खाटीक यांचे बुलंदी नाव असलेल्या सायकल दुरुस्तीच्या दुकानासमोर असलेल्या २० ते २२ हजार रुपये किमतीच्या एकुण ९ सायकलींना अज्ञात व्यक्तीने आग लावून नुकसान करुन दोन समाजात तेढ निर्माण होवून सार्वजनिक शांतता भंग करण्याचे कृत्य केले. म्हणून नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरच्या दोन्ही घटना जातीयदृष्ट्या संवेदनशील असल्यामुळे नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांनी सदर घटनांचे गांभीर्य लक्षात घेवून स्थानिक गुन्हे शाखा व नंदुरबार शहर पोलीस ठाण्याची वेगवेगळी तपास पथके तयार करुन त्यांना दोन्ही गुन्ह्यातील अज्ञात आरोपींना तात्काळ ताब्यात घेण्याकामी निर्देश दिले होते.

त्याप्रमाणे तपास पथकांनी घटनास्थळाचे आजुबाजुला असणारे सीसीटीव्ही, गोपनीय बातमीदार व इतर तांत्रिक बाबी यांच्या मदतीने कल्पेश रविंद्र कासार वय-३० रा. तांबोळी गल्ली, नंदुरबार याला ताब्यात घेतले असून त्याने दोन्ही गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. त्याच्याविरुध्द् पुढील कायदेशीर कार्यवाही सुरु आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., उपअधीक्षक संजय महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार खेडकर, वासुदेव देसले, सहा. पोलीस निरीक्षक श्री. दिनेश भदाणे, उप निरीक्षक विकास गुंजाळ, पोलीस नाईक राकेश मोरे, पोलीस अंमलदार विजय ढिवरे, आनंदा मराठे, अभय राजपुत तसेच नंदुरबार शहर पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक बलविंद्र ईशी, पोलीस अंमलदार किरण मोरे, कल्पेश रामटेके, राहुल पांढारकर यांच्या पथकाने केली. दरम्यान, अफवांवर विश्वास ठेवू नये. सण/उत्सव दरम्यान शांतता भंग करणारे तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणून सामाजिक शांतता भंग करणाऱ्या काही समाज कंटकांकडून सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोस्ट, व्हिडीओ प्रसारीत केले जातात. नंदुरबार जिल्हा पोलीस दलातील सायबर सेलमार्फत सोशल मीडियावर २४ तास विशेष लक्ष ठेवण्यात येत असून सोशल मीडियावर बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या इसमांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त यांनी दिला आहे.

पान ३ वरुन ...

## तुझे आहे तुजपाशी

'तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलाशी' अशी का झाली असावी? संपन्न वारशाचा, संस्कृतीचा, सहिष्णुतेचा माणसांना विसर का पडत असावा? सद्गुण अंगीकारणे दुष्कर का वाटत असावे? त्याची आठवण संतच सातत्याने करून देतात. 'हृदयातील भगवंत राहिला.. हृदयातून उपाशी' असा उपदेश करतात. जवळी असता जगज्जीवन । का धांडोळीसी वन.. असा प्रश्न संत ज्ञानेश्वर महाराज विचारात तर देहीं असोनियां देव । वृथा फिरतो निर्दैव असे संत तुकाराम महाराज म्हणतात. ते सगळे माणसांना त्यांच्या आतल्या परमेश्वराची भक्ती करायला सुचवतात. ज्याची समाजाला कधी नव्हे इतकी गरज आहे. वातावरण कलुषित आहे. माणसे एकमेकांना माणसे मानेनाशी होत आहेत. अहंकार आणि गर्व हीच जणू माणसाची ओळख बनत आहे. जी सामाजिक हिताची नाही. देव कोणी वेगळा आहे हा माणसांचा भ्रम आहे, तो प्रत्येकातच वसलेला आहे. सद्गुणांची आराधना करण्यातच समाजाचे हित दडलेले आहे असेच जणू संतांना सुचवायचे असावे. ज्यातील मर्म माणसांनी समजावून घेण्याची गरज आहे.

## पंढरीत १२ लाख वारकरी दाखल

भाविकांनी फुल्ल झाली आहे. शहरातील मठ,धर्मशाळा या ठिकाणी भाविक मुक्कामी आहेत. तसेच रस्त्याकडेला राहुट्या , तंबू टाकून भाविक भजन, कीर्तन, हरिनामाचा जयघोष कानी पडत आहे. शहरातील लॉज ,भक्त निवास हे देखील हाऊसफुल्ल झाले आहेत. मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने फुलून गेला आहे. चंद्रभागा नदी, वाळवंट भाविकांची गर्दी दिसून येत आहे. नदीचे स्नान,भटक पुंडलिक मंदिराचे दर्शन घेवून भाविक दर्शन रांगेत उभा आहे. मंदिर समितीने दर्शन रांगेतील भाविकांना पावसाचा त्रास होऊ नये म्हणून पत्रा-शेड उभे केले आहेत. या शिवाय आरोग्य , पिण्याचे पाणी ,नाष्टा दिला जात आहे. तसेच राज्य सरकारच्या वतीने पिण्याच्या पाण्याची बाटली मोफत वाटप केले जात आहे . दर्शन रांगेत भाविकांना देवाचे थेट दर्शन घेता यावे यासाठी विशेष व्यवस्था केल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली आहे. चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर जागेत भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. कोणताही अनुचीत प्रकार होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त तसेच गर्दीच्या ठिकाणी माउली पथक पोलीस प्रशासनाने तैनात केले आहे.

## शिरपुरातील अवैध सावकाराला अटक

व्याजासहित एकूण १ कोटी ३७ लाख ७० हजार २०० रुपये संदीप जमादार यास रोख स्वरुपात परत केले. मात्र तरी देखील तो अजूनही तक्रारदाराकडे पैशांची मागणी करीत असून पैसे दिले नाही तर तुला व तुझ्या मुलाला शिरपूरमध्ये जिवंत राहू देणार नाही. तुम्हाला मारुन टाकू व तंगडया तोडून टाकू, अशी धमकी देतोय. त्यास तक्रारदार अजितसिंग हे हिशोब समजविण्यासाठी गेले असता त्याने शिवीगाळ करीत अंगावर येतो, धक्काबुक्की करतो. गायब करुन टाकू, अशी धमकी देवून शारिरक, मानसिक व आर्थिक पिळवणूक करीत आहे. त्याने अद्यापही तक्रारदार याची शेती परत न करता आर्थिक फसवणूक केली आहे. त्यानुसार त्यांच्याविरोधात काल भारतीय न्याय संहिता २०२३ कलम- ३१६(२), ३१८(४), ३३६(२) (३), ३३८, ३४० (२), ३५१(२) (३), ३५२, सह महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम-२०१४ चे. कलम ३९ प्रमाणे शिरपूर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग झाल्यानंतर पथकाने गुन्हयातील मुख्य आरोपी संदिप प्रेमसिंग जमादार यास काल दि. १५ रोजी रात्री शिरपूर शहरातून ताब्यात घेत अटक केली. तसेच त्याच्या सावकारी व्यवसायाबद्दल माहिती काढली असता त्याच्याकडे सावकारी व्यवसायाबाबतचे कोणतेही अधिकृत लायसन नसून त्याने तक्रारदारास यापूर्वी दाखवलेले सावकारीचे लायसन हे बनावट आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेशकुमार घुसर तसेच पोसई अमोल देवढे, असई हिरालाल ठाकरे, गयासुद्दीन शेख, पोहवा श्रीकांत पाटील, प्रभाकर बैसाणे, गणेश खैरनार, विलास पाटील यांच्या पथकाने केली.

## बुलडाण्यातील व्यावसायिकाची सिनेस्टाईल लूट

कपडे फाडून टाकले. मोबाईलमधील डेटा ट्रान्सफर करून घेतला. गळ्याला चाकु लावून व पिस्तुलीचा धाक दाखवित ठोकण्याची धमकी दिली. त्यामुळे महमंद याने मित्राकडून ऑनलाईन १५ हजार रूपये मागावून घेतले. त्यानंतर लुटारूंनी फिर्यादीच्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या एटीएममधून स्वॅपमशीनवरून २ लाख २० हजार रूपये काढून घेतले. सायंकाळी परत फिर्यादीस दुचाकीवर बसवून छडवेलगावानजी आणून सोडले. तेथे मोबाईल परत दिला. तसेच त्यांच्याजवळील ५०० रूपयांची नोट दिली. त्यानंतर फिर्यादी हा नंदुरबारबसमध्ये बसला असता ती नोट कंटक्टरला दिली असता ती नकली असल्याचे सांगितले. त्यानंतर मित्राकडून एका प्रवाशाच्या मोबाईल ७०० रूपये मागावून फिर्यादी हा नंदुरबार तेथून रेल्वे छत्रपती संभाजी नगर व पुढे बसने देऊळगाव राजा गाव गाठत बुलडाणा जिल्हा पोलिसात तक्रार दिली. हा गुन्हा शुन्य क्रमांकाने निजामपूर पोलिस ठाण्यात वर्ग झाला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक हर्षवर्धन गवळी करीत आहेत.

## निधन वार्ता

### आसाराम पाटील

■ दोंडाईचा । श.प्र



सुराय ता. शिंदखेडा येथील आसाराम देवराम पाटील (वय ७६) यांचे आज दि.१६ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सुन, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. ते दोंडाईचा येथील मोबाईल व्यवसायिक कैलास पाटील यांचे वडील होत.

**सोमवार १५/०७/२०२४**
मधुर नाईट -५७०-०८-१२५
धनलक्ष्मी नाईट-२४५-१०-१३६
मेन बाजार -४५९-८२-१५६
मिलन ना.-७८९-४८-२६०

**मंगळवार १६/०७/२०२४**
मधुर मॉर्निंग-५७९-१७-३६८
मधुर डे-५८८-१०-२३५
मधुर नाईट-२३४-९
धनलक्ष्मी डे-११९-१०-३८९
धनलक्ष्मी नाईट-१८०-९
मेन बाजार -
कल्याण-१४८-३७-४६७
मिलन डे -३६०-९७-२७८
मिलन ना.-

# नवापूर येथे महसूल बुडवून इतर मार्गाने वाहतूक



■ नवापूर । श.प्र.

शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून इतर मार्गाने अवजड वाहने ये-जा करीत असल्याबाबतचे निवेदन बेडकी, बंधारफळी, आमपाडा, गडद, करंजी खुर्द, खेकडा, झामणझर, लक्कडकोट, खोकरवाडा, कारेघाट, भवरे, बारी, बिलमांजरे, मुगधन, किलवनपाडा, खरबुर्डी, सुकाफळी, करंजी ओवारा, युवा, भुरीवेल, सागीपाडा, खाटीजांबी येथील रहिवासी व नागरीकांनी तहसिलदार, पोलिस निरीक्षक यांना दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नवापूर तपासणी नाका येथे अवजड वाहने त्यांच्या कागदपत्रांची तपासणी न करता व शासनाचा महसूल न भरता बेडकी, बंधारफळी मार्गे करंजी ओवारापर्यंत जातात. या ठिकाणी बेडकी, बंधारफळी, आमपाडा, गडद, करंजी खुर्द, खेकडा, झामणझर, लक्कडकोट, खोकरवाडा, कारेघाट, भवरे, बारी बिलमांजरे, मुगधन, किलवनपाडा, खरबुर्डी, सुकाफळी, करंजी ओवारा, थुवा, भुरीवेल, सागीपाडा, खाटीजांबी या गावातील नागरिकांची रहदारी असते व त्यांचे वाहने देखील ये-जा करीत असतात. अशा वेळी हे वाहने अतिशय जोरात येतात व समोरुन येणाऱ्या वाहनांचा कुठल्याही प्रकारे विचार न करता समोरील वाहनाच्या अंगावर जातात. यामुळे अनेकदा अपघातदेखील झालेले आहेत. सदर पत्र प्राप्त झाल्यापासून दोन दिवसाच्या आंत कार्यवाही न झाल्यास व वाहनांची या मार्गे ये-जा बंद न झाल्यास नवापूर येथील तहसिल कार्यालय व पोलीस स्टेशनच्या आवारात उपोषण करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. अवजड वाहनांनी नवापूर तपासणी नाका येथे शासनाचा महसुल भरावा याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही व्हावी असेही निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर माजी पं.स सभापती दिलीप गावीत, काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष दिलीप गावीत, बोकळझर माजी सरपंच राहुल गावीत, आयुब गावीत, सुनिल चौधरी, अरविंद गावीत, राजू गावीत, सोनू पाडवी, आदन गावीत, रिनेश मावची, अशोक गावीत, जेशवन गावीत, रिकेश गावीत, इमानवेल गावीत, विजय गावीत, कंमाजी गावीत, गोमा गावीत, नितेश गावीत, विजय गावीत, वनिस गावीत, राहुल गावीत, लाजरस गावीत, पौलस कुंवर यांच्या सह्या आहेत.


# धुळे महानगरपालिका, धुळे

## बांधकाम विभाग ई - निविदा सुचना क्र.११ सन २०२४-२५

मा.आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे हे खालील कामांकरिता ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदार/संस्था/व्यक्तीकडून B1 पध्दतीने Percentage Rate नुसार निविदा दर मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| | मा.सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २३-२४ अंतर्गत | |
| १. | धुळे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.१० गट क्र. व उपविभाग १६/१८ माऊली नगर येथील शासकीय मोकळ्या जागेवर संरक्षण भिंत बांधणे. | 19,97,192/- |

**उपरोक्त निविदांबाबतचा** सविस्तर तपशिल https:/mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.**18/08/2024, सायं.17.05** वाजेपासून पहावयास मिळेल.

जा.क्र./धुमपा/बां.वि./१२/२०२४-२५
दिनांक : १५/०७/२०२४

**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका, धुळे**


## कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २७-०५-२०२४ १-०६-२०२४ | ३७८ ०० ५७८ | २५९ ६३ १२० | १२६ ९४ १३० | ४५५ ४४ ३३८ | ४०० ४६ १७९ | १५७ ३४ ६८० |
| ०३-०६-२०२४ ०८-०६-२०२४ | ६८८ २७ ८९० | १७८ ६३ ५९९ | ७९९ ५० १२७ | ११३ ५३ ५९९ | २६९ ६२ ३९० | २७७ ६२ ३९० |
| ०३-०६-२०२४ ०८-०६-२०२४ | ६८८ २९ ३७९ | २२३ ७५ ६९० | १४४ ९० ३८९ | ११६ ८२ २२८ | ३५९ ७० ६७७ | ५५६ ६५ २४९ |
| १७-०६-२०२४ २२-०६-२०२४ | ६६९ १५ २४९ | ४८० २५ १४० | ३५९ ७५ ७८० | २३७ २६ ६०० | २४७ ३१ १४६ | २३४ ९८ १७० |
| २४-०६-२०२४ २९-०६-२०२४ | ७८९ ४५ १६८ | ६६० २६ २६८ | ३४९ ६४ १४९ | १३० ४७ ११५ | ८८० ६६ ४५७ | ५६० १५ ६९० |
| ०१-०७-२०२४ ०६-०७-२०२४ | ४६७ ७७ ४५८ | १२३ ६६ ३५८ | १३८ २४ १६७ | २६८ ६४ ३४७ | ४८९ १३ ४४५ | ४६८ ८४ ३५६ |
| ०८-०७-२०२४ १३-०७-२०२४ | ६७९ २६ ३६७ | ४५० ९१ ३३५ | १२९ २९ ९०० | २६० ८८ ११६ | ५७८ ०४ ४०० | १७७ ५५ १६८ |
| १५-०७-२०२४ २०-०७-२०२४ | ४५० ९५ ६९० | १४८ ३७ ४६७ | | | | |

## मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २७-०५-२०२४ १-०६-२०२४ | ३३९ ५९ २७० | ४७९ ०२ २४६ | ९९० ८६ २५९ | ३८० १६ १७८ | ३४४ १० १३६ | ५७७ ९८ ४४० | ● |
| ०३-०६-२०२४ ०९-०६-२०२४ | १२७ ०१ १४६ | २४० ६२ १४७ | ३४९ ६९ ३३३ | ३४५ २५ २६७ | ५८८ १२ ४८० | २३४ ९४ २५७ | ● |
| ०३-०६-२०२४ ०९-०६-२०२४ | ४६८ ८६ ८८० | १६७ ४४ १५८ | १४६ १५ २५८ | ६७० ३९ ६६७ | १७८ ६० ३७० | ३४० ७८ ५५८ | ● |
| १७-०६-२०२४ २३-०६-२०२४ | ३३४ ०० २३५ | २९० १४ १५८ | ४९० ३२ १४७ | १४९ ४७ ४६७ | १२८ १० २३५ | ४४५ ३१ १२८ | ● |
| २४-०६-२०२४ २९-०६-२०२४ | ११२ ४० १४५ | ८८० ६६ १२३ | ३३७ ३४ १६७ | २३६ १६ ८८० | २६० ८८ २६० | २५७ ४९ १८० | ● |
| ०२-०७-२०२४ ०७-०७-२०२४ | ११५ ७१ ३९९ | २३७ २१ ५६० | २३० ५० ३८९ | ११३ ५४ ४०० | २८० ०८ २२४ | १४४ ९१ २४५ | ● |
| ०८-०७-२०२४ १४-०७-२०२४ | ४५६ ५० २९९ | ५६८ ९६ ४६६ | ७८९ ४१ २४५ | २२९ ३८ ४६८ | १५० ६७ ८९० | ३६९ ८३ १२० | ● |
| १५-०७-२०२४ २०-०७-२०२४ | ६६० २६ १५० | ३६० ९७ २७८ | | | | | ● |

## मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| ३८० १९ ४७८ | १७० ८९ ३७९ | १५७ ३५ २३० | १४८ ३२ ६७९ | २६९ ७६ २६८ | २३० ५९ ५६८ |
| ५६७ ८५ २६७ | ३५८ ६३ १४८ | ६८० ४३ ७८८ | १४८ ३० २८० | १३७ १५ ८८९ | ५५७ ७९ ३६० |
| ३४९ ६७ ३४० | ३६० ९५ ६९० | २३६ १५ २३० | २७८ ७२ १३८ | ३६९ ८९ १३५ | ६८० ४८ १८९ |
| ३७० ०१ २३६ | ६६८ ०० १९० | ३९० २२ २०० | १७० ८८ ५६७ | १३७ १३ १२० | २६६ ४२ ७७८ |
| ५६९ ०० ५७७ | १७० ८६ ७९० | ७७९ ३१ ५८८ | ३३७ ३३ ३४६ | १२६ ९५ ११३ | ७७८ २३ ६८९ |
| ६८८ २५ २३० | ३५८ ६८ २७९ | ३८० १४ ११२ | ६६० २८ ५५८ | ३५० ८८ ४६८ | ५५९ ९६ २६८ |
| ३५८ ६२ १५६ | ७९० ६२ २२८ | १७९ ७२ १४७ | २६९ ७६ १२३ | १४० ५४ २३९ | ४९९ ६८ २७८ |
| ७८९ ४८ २६० | | | | | |

# क्लासिफाईड

## नशिबाची परीक्षा

बुधवार १७/०७/२०२४

*** मिलन डे ***
१२९ ४८० ६६० **२-३** १२० ६७० ५८० | सिंगल २-४-७
जोड २६-०३-४१-७९-३५

*** कल्याण बाजार ***
१६७ ३५८ ३३८ **४-१** १३७ १४६ १०० | सिंगल ४-३-९
जोड ४६-२१-३७-९८-१५

*** मुंबई (मेन) बाजार ***
१२८ २९० २२७ **१-०** १४५ २३५ ५५० | सिंगल १-६-७
जोड १३-६९-३०-७५-०४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६


## दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ. पालवे अॅडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इजंक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... अॅडमिट सुविधा... * (विशेष) गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२५)(CRINV-2324JL/CRG00555)

## १००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२, www.drpalve nashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही.एम./०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00554)

## उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघे दुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकन गुनीया, जुनाट अॅलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो. नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही.एम./ ०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00556)


## देशदूत

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/-प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै.'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

### सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.